ARTHA Poona 4.

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष २१ | पुणें, बुधवार तारीख ९ मार्च, १९५५ | अंक १०

## विविध माहिती

**जपानी धर्तीची गिरणी**—कानपूर येथील एका कंपनीनें पतिआळा येथें जपानी पद्धतीची एक छोटी सुताची गिरणी काढण्याचें ठरविलें आहे. गिरणींत २०,००० चात्या बसविण्यांत येतील. गिरणीसाठीं लागणारी यंत्रसामुग्री तयार करण्यासाठीं प्रथम एक कारखाना काढण्यांत येणार आहे. त्यासाठीं ४० लाख रुपयांचें भांडवल लागेल. पेप्सुमध्यें पिकणारा अमेरिकन कापूस सुतासाठीं वापरण्यांत येणार आहे.

**शेतमजुरांना किमान वेतन**—१९५६ च्या मार्च महिन्यापासून उत्तर प्रदेशांतील शेतमजुरांच्या बाबतींत किमान-वेतन-कायद्याची अंमलबजावणी करण्याचें राज्य सरकारनें ठरविलें आहे. पूर्ण वयांत आलेल्या मजुराला रोज १ रुपया अगर मासिक २६ रुपये वेतन देण्यांत येणार आहे. १८ वर्षांखालील मजुराला रोज १० आणे अगर मासिक १६ रु. ४ आणे वेतन देण्यांत येईल.

**शिक्षण-विषयक संशोधन**—टीचर्स कॉलेज ऑफ म्हैसूर ह्या संस्थेंत शिक्षणविषयक संशोधन करण्यासाठीं भारतीय सरकार दोन शिष्यवृत्त्या स्थापन करणार आहे. ह्या दोन्ही शिष्यवृत्त्या १५,००० रुपयांच्या असून त्या दोन वर्षेपर्यंत चालू रहातील. पहिल्या पंचवार्षिक योजनेंत शिक्षण-विषयक संशोधन करण्याचा जो कार्यक्रम आहे, त्याला अनुसरून हा उपक्रम करण्यांत आला आहे.

**बँक अवार्ड कमिशनचे अध्यक्ष**—बँक अवार्ड कमिशनचे अध्यक्ष म्हणून भारत सरकारनें मुंबई हायकोर्टाचे न्यायाधीश श्री. पी. बी. गजेंद्रगडकर ह्यांची नेमणूक जाहीर केली आहे. कमिशनचे दिवंगत अध्यक्ष, न्यायमूर्ति राजाध्यक्ष, ह्यांच्याकडे सोंपविलेल्या बँकविषयक झगड्याच्या चौकशीचें काम त्यांनीं पूर्ण करावयाचें आहे.

**हैदराबाद स्टेट बँक**—हैद्राबाद स्टेट बँकेसाठीं बांधण्यांत येत असलेल्या नव्या इमारतीचें काम आतां पूर्ण होत आलें आहे. इमारतीसाठीं सुमारें १६,६३,००० रुपये खर्च येईल असा अंदाज आहे. इमारत तीन मजली असून एक मजला जमिनींत खोदून तयार केलेला आहे. मॅनेजिंग डायरेक्टरसाठीं वरच्या मजल्यावर जागा ठेवण्यांत आली आहे.

**सौराष्ट्रांत नवे रस्ते**—सौराष्ट्र सरकारनें राज्यांतील खेड्यांना रस्त्यांनीं जोडण्याचा एक मोठा कार्यक्रम आंखला आहे. सौराष्ट्रांत ४,३५० खेडीं आहेत. त्यांना पोंचणारे नवे रस्ते बांधण्यासाठीं २० कोटी रुपये खर्च येईल. सौराष्ट्रांत सध्यां ३,२०० मैल लांबीचे रस्ते आहेत. आणखी ८,८०० मैल लांबीचे रस्ते बांधण्याचा कार्यक्रम आहे.

**भारतामधील परकीय भांडवल**—१९४८ पासून १९५४ च्या सप्टेंबरपर्यंत भारतांत ७०·२५ कोटी रुपये परकीय भांडवल गुंतविण्यास परवानगी देण्यांत आली, अशी माहिती लोकसभेंत सांगण्यांत आली. त्याशिवाय देशांतील परकीय भांडवलाच्या कंपन्यांना ८·२१ कोटी रुपयांचें नवें भांडवल येथें उभारण्यासहि मंजुरी देण्यांत आली.

**सौराष्ट्रांतील केंद्रांसाठीं मधमाशा**—सौराष्ट्रांत मधमाशा पाळण्याच्या धंद्याला उत्तेजन देण्यांत येत आहे. मधमाशा पाळण्याच्या व्यवसायाचें शिक्षण घेण्यासाठीं कांहीं जणांना उत्तर-प्रदेशांतील अलमोरा ह्या ठिकाणीं पाठविण्यांत येणार आहे. त्रिवेंद्रम येथें पोसण्यांत आलेलीं मधमाशांचीं कांहीं पोवळींहि सौराष्ट्रामधाल समाज-विकास योजनांना पुरविण्यांत येणार आहेत.

**कोसी योजनेवर काम करणाऱ्यांना सवलत**—कोसी नदीवरील योजनेंत काम करण्यास जाणाऱ्या स्वयंसेवकांना तेथें जाण्यासाठीं तिसऱ्या वर्गाचा प्रवास निम्म्या दरानें करण्याची सवलत देण्यांत आली आहे. जे तिसऱ्या वर्गाचा पूर्ण आकार देतील त्यांना इंटरनें प्रवास करूं देण्यांत येईल व इंटरचा आकार देणाऱ्यांना दुसऱ्या वर्गानें प्रवास करूं दिला जाईल.

**औद्योगिक कामगारांसाठीं घरें**—आर्थिक मदत देऊन उद्योगधंद्यांतील कामगारांसाठीं घरें बांधण्याच्या योजनेस अनुसरून भारत सरकारनें ह्या वर्षाच्या जानेवारींत राज्य-सरकारांना व खाजगी कंपन्यांना मिळून ८६,९२,४५८ रुपये मंजूर केले. मुं सरकारला ४,७२,५०० रुपयांची रक्कम मदत म्हणून व आणखी तेवढीच रक्कम कर्ज म्हणून देण्यांत येणार आहे.

**आसाम सरकारला मदत**—पूर्व-बंगालमधून आलेल्या मध्यमवर्गीय निर्वासितांची राहण्याची सोय करण्याची योजना आसाम सरकारनें आंखली आहे. आसाममधील निरनिराळ्या शहरांतून त्यांना राहण्यासाठीं घरें बांधण्यांत यावयाचीं आहेत. ह्या योजनेचा अधिक विस्तार करण्यासाठीं मध्यवर्ती सरकारनें आसाम सरकारला ५ लाख रुपये देऊं केले आहेत. रकमेंतून निर्वासितांना घरें बांधण्यासाठीं कर्जें देण्यांत येतील.

**अणुबाँम्बचा हल्ला झाला तर**—अमेरिकेचे अध्यक्ष ऐसेनहोवर ह्यांनीं देशांतील रस्त्यांची वाढ करण्यासाठीं बरीच मोठी रक्कम काँग्रेसनें मंजूर करावी अशी मागणी केली आहे. अमेरिकेवर अणुबाँम्बचा हल्ला झाल्यास लोकांना हल्ल्याच्या जागांपासून लवकर पळ काढतां यावा म्हणून अधिक रस्त्यांची जरूरी आहे. त्या शिवाय, रस्त्यावरील अपघातांत मरणाऱ्यांची संख्याहि रस्ता-वाढीनें कमी होईल, असें त्यांचें म्हणणें आहे.

**जपानी भातशेती**— हैद्राबाद राज्यांत जपानी पद्धतीनें करण्यांत येणाऱ्या भातशेतीच्या लागवडीखाली ३,००,००० एकरांपेक्षा अधिक जमीन आहे. प्रयोग चालू असलेल्या कांहीं जिल्ह्यांतून दर एकरीं ५,४८० पौंड भाताचें पीक काढण्यांत आलें. भारतामधील परंपरागत पद्धतीनें १,५०० पौंडच पीक येतें.

**इंडोनेशिआ भारतीय विमानें घेणार**—हिंदुस्थान एअरक्रॅफ्ट फॅक्टरी या कारखान्यांत एच २ प्रकारचीं वैमानिकांना शिक्षण देण्यासाठी लागणारीं विमानें तयार होतात. अशा प्रकारचीं बरींच विमानें विकत घेण्यासाठी इंडोनेशिआचें सरकार भारताकडे चौकशी करीत आहे. अशींच चौकशी सिलोनकडूनहि होत आहे. कारखान्यांत दरमहा ५ विमानें तयार होतात.

**धारवाड म्युनिसिपालिटीची मागणी**—धारवाड म्युनिसिपालिटीच्या खास सभेंत, शहराला पाण्याचा पुरवठा करण्याच्या योजनेसाठी मुंबई सरकारनें ८॥ लाख रुपयांचें कर्ज द्यावें अशी विनंति करणारा ठराव एकमतानें मंजूर करण्यांत आला.

**आयर्लंडमधील सुबत्ता**—संयुक्त-राष्ट्र-संघटनेच्या आंकडेशास्त्रज्ञांनीं पुढील माहिती जमविली आहे. १९५० ते १९५३ च्या दरम्यान जगाची लोकसंख्या २४५.५ कोटींपासून २५४.७ कोटींपर्यंत वाढली. ब्रह्मदेशांतील दर हजार लोकसंख्येशीं मृत्यूचें प्रमाण ३३.५ इतकें, म्हणजे जगांत सर्वांत अधिक आहे. आयर्लंडमधील लोकांना सर्वांत उत्तम आहार दररोज मिळतो. तेथील नागरिकाला दररोज ३,५०० कॅलरीज उष्णतामान निर्माण करणारें खाणें मिळतें. १९५१ सालीं भारतांतील नागरिकांना फक्त १,५९० कॅलरीज निर्माण करणारें अन्नच रोज मिळत असे.

**इंदूर येथें घड्याळांचा कारखाना**—इंदूर येथें घड्याळें तयार करण्याचा सरकारी मालकीचा कारखाना उभारण्यांत आला असून त्यांत आतां उत्पादनाला प्रारंभ झाला आहे. कारखान्याला १,५०,००० रुपयांची रक्कम मदतदाखल देण्यांत आली असून १५,००० रुपये कर्ज म्हणून देण्यांत आले आहेत. प्रारंभीं कारखान्यांत दरमहा १०० घड्याळें तयार होतील.


॥ श्री ॥

# दि बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लि. पुणें २.

**॥ भुंकती ते द्यावे भुंको । आपण त्याचे नये शिको ॥**

तुकाराम महाराज

— फेब्रुवारी १९५५ अखेर —

## ★ साठ हजार पोतीं साखर तयार झाली ★

— चालू हंगामांत एक लक्ष पोतीं साखर तयार होईल —

जुन्या मशिनरीनें सबंध हंगामांत पन्नास ते पंचावन्न हजार पोतीं साखर तयार होत होती व भागीदारांना दहा टक्के डिव्हिडंड देण्यांत येत होतें.

— आतां दर वर्षीं एक लक्ष किंवा जास्त पोतीं साखरेचें उत्पादन होईल —

:: व्याजासह सर्व ठेवी परत केल्या जातील. ::

## भागीदारांना दहा किंवा जास्त टक्के नफा मिळेल

—सरकारी थकबाकी १०,५३,६७६ रुपये दिली आहे—

= चालू हंगामाचें सरकारी देणें ३,२०,२९३ रुपये दिलें आहे =

★

**फॅक्टरी चालविण्याला सिंडिकेट नवीन ठेवी घेत नाहीं**

ज्यांना सवड असेल त्यांच्या ठेवी घेऊन ज्या जुन्या ठेवीदारांना मुदत वाढवून देण्याला सवड नसेल त्यांच्या ठेवी सिंडिकेट परत करते.

ठेवींचे फॉर्म सिंडिकेटच्या पुणें येथील मुख्य कचेरींत मिळतील.

कॉमनवेल्थ बिल्डिंग,<br>९८० सदाशिव पेठ, लक्ष्मीरोड, पुणें २.<br>दि. ३-३-१९५५

चंद्रशेखर गोविंद आगाशे,<br>मॅनेजिंग एजंटस्.

# अर्थ

बुधवार, ता. ९ मार्च, १९५५





संस्थापक : प्रो. वामन गोविंद काळे

संपादक : श्रीपाद वामन काळे


### नव्या एक्साइज करांचा उद्योगधंद्यांवर परिणाम

श्री. देशमुख ह्यांनीं सुचविलेल्या करवाढींपैकीं नव्या एक्साइज पट्ट्यांचा औद्योगिक उत्पादनावर काय परिणाम होईल, ह्याचा नीट विचार झाला पाहिजे. मथाई कमिशननें केलेल्या शिफारसींची त्यांनीं अंमलबजावणी केली असली, तरी त्याचे दुष्परिणाम त्यामुळें नष्ट होणार नाहींत. नफ्यावरील करांत वाढ झाली तर त्यामुळें मालाच्या किंमती वाढत नाहींत; पण एक्साइज करामुळें संबंधित जिनसांची किंमत वाढते. किंमतीमध्यें वाढ झाली, म्हणजे तिचा विक्रीवर परिणाम होतो व त्यामुळें नफाहि उतरतो. युद्धकाळानंतर वाढीस लागलेल्या उद्योगधंद्यांचे नफे अद्याप स्थिरावलेले नाहींत व त्यांना फार मोठे नफे होतात असेंहि नाहीं. १०% करापासून ४ कोटी रुपये जमविण्याची अर्थमंत्र्यांची योजना आहे. म्हणजे, संबंधित आठ उद्योगधंद्यांचें वार्षिक उत्पादन सुमारें ४० कोटी रुपयांचें असावयास हवें. आयात मालाची जागा अंतर्गत उत्पादनानें घेतली, म्हणजे आयातीवरील करांचें सरकारचें उत्पन्न बुडतें हें खरें आहे. हें भरून काढण्यासाठी अंतर्गत उत्पादनावर जकात बसविण्याचें धोरणहि चुकीचें नाहीं. तथापि, ह्या जकातींचा उद्योगधंद्यावर काय परिणाम होतो, ह्याकडे काळजीपूर्वक लक्ष देण्यांत आलें पाहिजे. करवाढ कोणालाच प्रिय नसते; पण ती आवश्यक ठरल्यानंतर अर्थमंत्र्यांना कमींत कमी हानिकारक करवाढ सुचवावी लागते. तेव्हां, एक्साइज करांचे संभाव्य दुष्परिणाम त्यांनीं लक्षांत घेतलेले नसतील हें संभवनीय नाहीं.

---

### तांदुळाच्या उत्पादनाची समाधानकारक परिस्थिति

दुसरें महायुद्ध संपल्यानंतर सुद्धां बरींच वर्षे भारतांत तांदुळाची टंचाई होती. पण गेल्या दोन–तीन वर्षांत इतर देशांप्रमाणें भारतांतहि गरज भागून निर्यात करण्याइतपत तांदुळाचें उत्पादन वाढलें आहे. एकंदरीनें सर्व जगांतच तांदुळाचें उत्पादन वाढून थोडाबहुत तांदूळ शिल्लक राहण्यासारखी परिस्थिति उत्पन्न झाली आहे. युद्धापूर्वी जगांतील बिन–सडलेल्या भाताचें उत्पादन १०·०५ कोटी टनाच्या आसपास होतें. १९५२ सालीं तें ११·०४ कोटी टन झालें आणि १९५३ सालीं तर ११·९२ कोटी टन भाताचें उत्पादन झालें. ह्या आंकड्यांत चीन व रशिआ ह्या देशांतील भाताच्या उत्पादनाचे आंकडे जमेस धरलेले नाहींत. भात शेतीखालील जमिनीच्या क्षेत्रांतहि वाढ झालेली दिसते. युद्धापूर्वी ६·५८ कोटी हेक्टर जमिनींत भात लावण्यांत येत असे. १९५२ व १९५३ सालीं अशा जमिनीचें क्षेत्र अनुक्रमें ७·६० कोटी हेक्टर व ७·८७ कोटी हेक्टर इतकें झालें. दुसऱ्या महायुद्धानंतरच्या नजीकच्या काळांत तांदुळाला भाव चांगला होता. त्यामुळें शेतकरी व भात पिकविणाऱ्या देशांचीं सरकारें ह्यांनीं भातशेतीला उत्तेजन दिलें त्याचा हा परिणाम आहे. अर्थातच अशा बऱ्याच देशांना आपल्या जवळील शिलकी तांदुळाची विल्हेवाट कशी लावावी असा प्रश्न पडला आहे. १९५५ सालीं किती तांदूळ निर्यातीसाठी मिळूं शकेल हा प्रश्न १९५४ सालच्या पिकावर आणि मागील सालाच्या शिलकीवर अवलंबून आहे. तथापि तांदुळाच्या व्यापारांतील प्रमुख देशांच्या परिस्थितीचा आढावा घेतां असें दिसतें कीं, १९५४ सालीं जगांत तांदुळाची प्रत्यक्ष जितकी निर्यात झाली त्यापेक्षा १९५५ सालीं अधिक तांदूळ निर्यात करण्यास मिळूं शकेल. गेल्या दहा वर्षांत भारताला तांदुळाची आयात करावी लागत असे. पण चालू सालीं भारतामधून दोन ते तीन लाख टन तांदूळ निर्यात करण्यांत येणार आहे.

---

### कमी उत्पन्नाच्या लोकांसाठी घरें

शहरांत वास्तव्य करणाऱ्या, कमी उत्पन्न असलेल्या लोकांना घरें बांधण्यास मदत करण्याची योजना भारत सरकारनें तयार केली आहे. ज्या लोकांना स्वतःच्या मालकीचें घर नाहीं व ज्यांचें वार्षिक उत्पन्न ६,००० रुपयांपेक्षा अधिक नाहीं, अशांच्यासाठी ती आखण्यांत आली ह्याहे. ह्या योजनेचा तपशील आंध्र राज्याच्या रजिस्ट्रार ऑफ को-ऑपरेटिव्ह सोसायटीज ह्यांनीं जाहीर केला आहे. स्वतःचीं घरें बांधण्यासाठी कमी उत्पन्नवाल्या लोकांना कर्जें देण्यांत येतील. पण जमिनीची व घराची मिळून जी किंमत होईल, त्या किंमतीच्या ८० टक्क्यांपेक्षा अधिक कर्ज मिळूं शकणार नाहीं. म्हणजे, घरें बांधणाऱ्यांनीं एकूण खर्चाच्या २० टक्के रक्कम तरी स्वतःच उभारली पाहिजे. ह्या २० टक्क्यांत जमिनीची किंमतहि धरण्यांत येईल. सामान्यतः अशी अपेक्षा आहे कीं, योजनेप्रमाणें बांधण्यांत येणाऱ्या घरांची किंमत १०,००० रुपयांपेक्षा अधिक असूं नये. तथापि, ह्या रकमेपेक्षां अधिक किंमतीचीं घरें बांधण्यास सरकारची हरकत आहे असें नाहीं. मात्र, सरकारकडून मिळणाऱ्या मदतीची रक्कम ८,००० रुपयांपेक्षा केव्हांहि अधिक असणार नाहीं. घरांतील प्रत्यक्ष रहाण्याच्या जागेचें क्षेत्रफळ ३८० चौरस फुटांपेक्षां कमी असूं नये आणि १,२०० चौरस फुटांपेक्षा अधिक असूं नये. शक्य तर दोन खोल्यांचीं बिऱ्हाडें बांधण्यांत यावींत आणि तीं फार महाग पडूं नयेत. कर्जाची फेड ३० वार्षिक हप्त्यांनीं करावयाची असून त्यावरील व्याज १९५४–५५ सालांत ५½ टक्क्यांपेक्षा अधिक असणार नाहीं. पुढील वर्षाचा व्याजाचा दर मागाहून जाहीर करण्यांत येणार आहे. ज्या लोकांना आर्थिक मदतीची अपेक्षा असेल, त्यांनीं स्थानिक सहकारी हौसिंग सोसायटीचे सभासद झाले पाहिजे, अशी अट आहे.

---

### डॉ. नारायणस्वामी नायडू ह्यांचा मृत्यु

सुप्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ डॉ. बी. व्ही. नारायणस्वामी नायडू, (चेअरमन, फॉरवर्ड मार्केट्स कमिशन) हे दि. ५ रोजीं राजकोट येथें कमिशनच्या कामासाठीं गेले असतांना, मृत्यु पावले. कमिशनचे अध्यक्ष होण्यापूर्वी ते टॅरिफ बोर्डाचे अध्यक्ष होते.

## छोट्या उद्योगधंद्यांना आणखी साह्य

हातमागाचा व्यवसाय, ग्रामोद्योग आणि छोटे उद्योगधंदे ह्यांना मदत म्हणून भारतीय सरकारनें आणखी कांहीं रक्कम मंजूर केली आहे. त्यापैकीं कांहीं कर्जाच्या रूपानें देण्यांत येणार असून कांहीं साह्य म्हणून देण्यांत येणार आहे. उत्तर प्रदेश सरकारला २,०९,१३२ रुपये मिळणार आहेत. त्यापैकीं १,००,००० रुपये हातमागाच्या व्यवसायाला अर्धस्वयंचलित माग पुरविण्यासाठीं खर्चावयाची आहे व ७५,००० रुपये इतर साधनसामुग्री विकत घेण्यासाठीं खर्चावयाची आहे. म्हैसूर राज्य सरकारला २,००,००० रुपये कर्ज म्हणून व ४५,००० रुपये मदत म्हणून मिळणार आहेत. कर्जाचा विनियोग विणकरांच्या सहकारी सोसायटयांना खेळतें भांडवल पुरविण्यासाठीं करावयाचा आहे. मदतीदाखल मंजूर केलेल्या रकमेंतून मरकारा, मंगलोर आणि हुबळी ह्या ठिकाणीं हातमागाच्या मालाचे डेपो उघडण्यांत येतील. मध्य भारत सरकारला १,२४,००० रुपयांची मदत देण्यांत येणार आहे. वरील रकमेचा उपयोग करून राज्यांत औद्योगिक शिक्षण देणारें एक केंद्र उघडण्यांत येईल. त्याशिवाय निरनिराळया प्रकारच्या छोटया उद्योगधंद्यांच्या विकासासाठीं १,१३,७९० रुपये मदत म्हणून आणि ६०,००० रुपये कर्ज म्हणून देण्यांत येणार आहेत. ह्या रकमांपैकी १,०६,८२५ इतकी रक्कम देवास, नरसिंगगढ व इंद्रर येथील कातडी कमावण्याच्या धंद्याची वाढ करण्यासाठीं खर्च करण्यांत यावयाचे आहेत. त्याशिवाय भिंड ह्या ठिकाणीं कातडी कमावण्याचें केंद्र स्थापन करण्यांत येणार आहे. अखिल भारतीय खादी व ग्रामोद्योग बोर्डाला १,००,०००रु. मदत देण्यांत येणार आहे. ह्या रकमेंतून ताडगुळाच्या धंद्याला कर्ज देण्यांत येईल.

## खाजगी मालकीचें अणुनिर्मित वीजकेंद्र

अमेरिकेंतील कन्सॉलिडेटेड एडिसन कंपनीनें अणु–शक्तीवर विजेची निर्मिति करण्याचा कारखाना काढण्याचें ठरविलें आहे. न्यूयॉर्कपासून ४० मैलांवर तो उभारण्यांत येणार असून त्याचें आवार ३५० एकरांइतकें मोठें असेल. चालू वर्षअखेर २ लाख किलोवॅट वीज उत्पन्न करण्याची यंत्रसामुग्री बसवितां येईल असा कंपनीच्या चालकांचा अंदाज आहे. हा विभाग चालू झाल्यावर न्यूयॉर्कमधील २,५०,००० नागरिकांच्या विजेच्या गरजा भागविल्या जातील. चार वर्षांत संपूर्ण कारखाना बांधून होईल. एडिसन कंपनी ही एकटीच ह्या नव्या क्षेत्रांत पदार्पण करीत आहे, असें नाहीं. दुसरी एक कंपनीहि अणु-शक्तीच्या साह्यानें ६०,००० किलोवॅट वीज उत्पन्न करण्याचा कारखाना बांधीत आहे. पण एडिसन कंपनी अशा प्रकारचा कारखाना सर्वस्वीं खाजगी भांडवलाच्या साह्यानें काढीत आहे, हा तिचा विशेष आहे. एडिसन कंपनीला सरकारची आर्थिक मदत मुळींच नाहीं. कोणत्याहि व्यापारी स्वरूपाच्या उपक्रमाकडे पहाण्याची जी दृष्टि, तीच ह्या कंपनीची वरील कारखान्याविषयीं आहे. विजेच्या मागणीसंबंधीं कंपनीनें जें संशोधन केलें आहे, त्यावरून न्यूयॉर्क भागांत विजेला अधिक मागणी आहे असें दिसून आलें व कंपनीनें केलेल्या शास्त्रीय संशोधनावरून अणूंचें इंधन ह्या कामीं उपयोगीं पडण्यासारखें आहे असें सिद्ध झालें. म्हणूनच कंपनीनें कारखाना काढण्याचें ठरविलें. ह्या कंपनीशिवाय डेट्रॉइट एडिसन कंपनी व यँकी इलेक्ट्रिक पॉवर कंपनी अशा आणखी दोन कंपन्याहि अणुशक्तीवर वीज उत्पन्न करण्याचे कारखाने काढण्याच्या खटपटींत आहेत.

## हातमागाच्या मालास उत्तेजन

### आणखी कांहीं विक्री–केंद्रें सुरू करण्यांत येणार

मुंबई राज्यांत लौकरच हातमागाच्या मालाची आणखी १०२ विक्री–केंद्रें उघडण्यांत येणार आहेत. जिल्हा औद्योगिक सहकारी संघ व राज्यांतील इतर मध्यवर्ती संस्था यांच्याकडे तीं सोंपविण्यांत येतील. राज्यांत यापूर्वीच ३० विक्री–केंद्रें उघडण्यास मंजुरी देण्यांत आली आहे. त्यापैकीं २२ केंद्रें उघडण्यांत आलीं असून राहिलेलीं आठ लौकरच सुरू करण्यांत येतील.

तसेंच हातमागाच्या कापडावर द्यावयाच्या रिबेटचें प्रमाणहि सरकारनें रुपयामागें दीड आण्याच्या ऐवजीं दोन आणे, असें केलें आहे. या सवलतीमुळें हातमागाच्या कापडाची मागणी वाढेल व त्याची विक्रीहि जास्त होईल, अशी अपेक्षा आहे. हातमाग विणकरांच्या सहकारी संस्थांनीं आपलें उत्पादन वाढवावें, म्हणून सहकारी खात्याच्या अधिकाऱ्यांनीं त्यांना उत्तेजन द्यावें असा सरकारनें आदेश दिला आहे. अशा प्रकारच्या संस्थांना आर्थिक मदत देण्यासाठीं १६ लाख रुपयांची रक्कम आधीच मंजूर करण्यांत आली असून याच कामासाठीं आणखी ५ लाख रुपयांची रक्कम लौकरच मंजूर करण्यांत येणार आहे. विणकरी लोकांच्या ज्या सहकारी संस्थांना सरकारकडून आर्थिक मदत हवी असेल त्यांनीं आपल्या जिल्ह्याच्या असिस्टंट रजिस्ट्रार ऑफ कोऑपरेटिव्ह सोसायटीज यांना लिहावें, असा त्यांना सल्ला देण्यांत आला आहे.

## सहकारी संस्थासंबंधीच्या कायद्यांत दुरुस्ती

१९२५ च्या मुंबई सहकारी संस्थांसंबंधीच्या कायद्यांत दुरुस्ती करण्याचा विचार असून त्याअन्वयें सहकारी संस्थांच्या गुन्हेगार प्रमोटरांच्या वर्तणुकीची चौकशी करण्याचें काम पुढील अधिकाऱ्यांकडे सोंपविण्याचे अधिकार रजिस्ट्रार ऑफ को–ऑपरेटिव्ह सोसायटीज् यांना देण्यांत येणार आहेतः— सिव्हिल जज्ज (सीनियर डिव्हिजन), डेप्युटी कलेक्टर किंवा डेप्युटी रजिस्ट्रार ऑफ को–ऑपरेटिव्ह सोसायटीज्. सदरहू दुरुस्ती बिल मुंबई सरकारच्या ता. १८ फेब्रुवारीच्या गॅझेटांत प्रसिद्ध करण्यांत आलें आहे. या बिलाचें उद्दिष्ट व कारणें सांगतांना असें म्हटलें आहे कीं, वरील कायद्याच्या ५०–अ कलमाखालील गैरवर्तणुकीबाबतच्या चौकशीसंबंधींचे अनेक अर्ज रजिस्ट्रारांकडे येत आहेत व हीं प्रकरणें गुंतागुंतीचीं असून, तीं निकालांत काढण्याच्या कामीं कांहीं तांत्रिक गोष्टी पुऱ्या कराव्या लागत असल्यामुळें या कलमांत दुरुस्ती करण्याची आवश्यकता भासली. तसेंच सदरहू कलमाशीं संबंधित असलेल्या इतर कांहीं कलमांतहि दुरुस्त्या करण्यांत येणार आहेत.

## " औषधें जरूर तेवढींच द्या "

ग्रेट ब्रिटनमधील नॅशनल हेल्थ सर्व्हिसखालील डॉक्टर सढळ हातानें औषधें लिहून देतात. त्यांत किमान २०% बचत करतां येण्याजोगी आहे, असें तज्ज्ञांचें मत आहे. दरसाल २०,००,००,००० प्रिस्क्रिप्शन्स दिलीं जातात व प्रत्येकास फक्त एक शिलिंग आकार पडतो. औषधें तयार करून देणाऱ्याजवळ असणारीं औषधें डॉक्टरांनीं लिहून द्यावींत आणि जरूरी इतकेंच औषध मिसळण्यास सांगावें, असें आरोग्य खात्याचें म्हणणें आहे. डॉक्टरांच्या सढळ हातामुळें सरकारला मात्र मोठा खर्च येतो व त्याचा बोजा नागरिकांवर पडतो.

## चालू वर्षाचा आढावा व पुढील वर्षाच्या अपेक्षा

### अर्थमंत्र्यांचें संसदेमधील भाषण

संसदेमध्यें श्री. चिं. द्वा. देशमुख ह्यांनीं आपला पांचवा अर्थसंकल्प सादर केला. त्यावेळीं त्यांनीं आर्थिक परिस्थितीचा आढावा घेतला. ते म्हणाले कीं, एका अर्थानें १९५४ अखेरीस युद्धोत्तर संधिकालीन परिस्थिति संपली असें म्हणतां येईल. अन्नोत्पादनांतील भरपूर वाढ, पुरवठ्याचे परिस्थितींत सुधारणा आणि चलन फुगवट्याच्या परिस्थितीचा अंत, या गोष्टींवरून युद्धकालीन तंगीची परिस्थिति संपल्याचें दिसून येते. १९५२ सालीं चालू झालेलें निर्नियंत्रणाचें काम १९५४ मध्यें जवळजवळ पूर्ण झालें आणि मागणी व पुरवठा शक्ति बऱ्याच मोठ्या क्षेत्रांत मोकळ्या झाल्या. यापुढें आंतरराष्ट्रीय परिस्थिति फारच चिघळली नाहीं किंवा अवर्षणासारखी एखादी नैसर्गिक आपत्ति आली नाहीं, तर देशांतील आर्थिक परिस्थिति मुख्यत्वेंकरून नियोजित आर्थिक विकासावरच अवलंबून राहील.

### किंमतींतील घटींचें स्पष्टीकरण

अर्थमंत्री पुढें म्हणाले कीं, वर्षांतील बरेच महिने किंमतींची प्रवृत्ति खालच्या पातळींवर स्थिरावण्याची होती. डिसेंबर १९५३ च्या अखेरीस घाऊक किंमतींचा निर्देशांक ३९२·६ होता, तो एप्रिल १९५४ च्या मध्यास बेतानेंच वाढून ४०४·२ झाला. तदनंतर किंमती कांहींशा वेगानेंच खालीं येऊन जून अखेरीस निर्देशांक ३७८·४ वर आला. सप्टेंबर महिन्याचे अखेरीस दिसून आलेली कांहींशी वाढ वगळतां खरीप पिकांच्या कापण्या होतात तोंच किंमती आणखी उतरूं लागल्या आणि जानेवारी १९५५ अखेरीस हा निर्देशांक ३६० वर आला.

किंमतींतील या घटीचें स्पष्टीकरण करतांना ते म्हणाले कीं, अन्नधान्यांच्या, गळित धान्यांसारख्या कांहीं कच्च्या मालाच्या आणि काळ्या मिऱ्यांसारख्या कांहीं इतर वस्तूंच्या किंमतींत घट झाल्यामुळेंच बव्हंशीं एकंदर किंमतमानांत घट झाली. गहूं पिकविणाऱ्या शेतकऱ्यांचे हितसंबंध सुरक्षित राहावेत म्हणून सरकारनें दर मणास १० रु. भावास पाठिंबा देण्याचें धोरण अंमलांत आणलें. तसेंच ज्या विभागांत भरड धान्यांपैकी ज्वारी व मका यांच्या किंमती दरमणीं ५॥ रु. हून व बाजरीच्या दरमणीं ६ रु. हून खाली उतरल्या होत्या, त्या विभागांतील कांहीं ठराविक बाजारांत वरील भावानें तीं धान्यें विकत घेण्याची तयारी दर्शवून सरकारनें त्या शेतकऱ्यांनाहि मदत करण्याचें ठरविलें. या उपायांमुळें एकंदरींत धीराची परिस्थिति निर्माण झाली.

घाऊक किंमतीमध्यें झालेल्या या घटीचा परिणाम निरनिराळ्या औद्योगिक केंद्रांतील राहणीमानाच्या निर्देशांकांतहि दिसून आला. जुलै-ऑगस्टमधील १११ या जास्तींत जास्त निर्देशांकाशीं तुलना करतां डिसेंबर १९५४ मधील निर्देशांक सुमारें १३ टक्यांनीं कमी म्हणजे ९४ होता. बऱ्याच केंद्रांतून, विशेषतः देशाच्या पूर्व भागांतील केंद्रांतुन, राहणीमानाचा निर्देशांक याहूनाहि घटला.

### १९५४–५५ चें दुरुस्त अंदाजपत्रक

चालू वर्षाच्या अर्थसंकल्पांतील १५·३६ कोटी रु. ही महसुली तूट बहुधा ५ कोटी रु. पर्यंत येण्याचा अंदाज आहे. उत्पन्नांत ६५ लक्ष रु. घट झाली असली तरी प्रत्यक्ष खर्चात ११.०१ कोटी रु. बचत झाल्यानें ही गोष्ट साध्य झाली आहे. अर्थसंकल्पांत पाकिस्तानकडून फाळणी कर्जापैकी ९ कोटी रु. मिळतील असें गृहीत धरले होतें. परंतु ही कर्जफेड झाली नसली तरी चहावरील निर्यात जकात वाढविल्यानें जकात उत्पन्नांत ५ कोटी रु. ची व इतर प्रकारें ३ कोटी रु. ची वाढ झाल्यानें ही तूट कांहीं अंशीं भरून आली.

खर्चात बचत झालेल्या ११·०१ कोटी रु. पैकीं ३·४१ कोटी रु. मुलकी खर्च व ७·६ कोटी रु. संरक्षण खर्च होता. तंबाखुवरील अबकारी जकातींतून मिळणारें उत्पन्न कमी झाल्यानें राज्य सरकारांना मध्यवर्ती अबकारी करांच्या उत्पन्नांतून द्यावयाचा वांटा कमी झाल्यानें १·१८ कोटी रु. ची बचत झाली, तर कांहीं राज्यांतील शिक्षण योजनांवरील खर्च करण्याचा वेग कमी झाल्यानें २·१३ कोटी रु. वांचले. तसेंच निरनिराळ्या राज्यांतील समाज–विकास–योजना व राष्ट्रीय शेती विस्तार कार्य यांस देण्यांत यावयाच्या मदतींपैकीं ४·४९ कोटी रु. उरले. अशा प्रकारें खर्चात बचत झाली असली तरी पूर व दुष्काळ कार्य साह्यासाठी ४ कोटी रु, स्थलांतरितांसाठी ८९ लाख रु., फ्रेंचांच्या भारतांतील वसाहतींसाठी ७६ लाख रु. चा जादा खर्च सरकारला करावा लागला.

काटकसर व संरक्षण खात्यांस लागणारां साधनसामुग्री मिळण्यांत अपेक्षापेक्षा झालेल्या मंद प्रगतीमुळेंच मुख्यतः संरक्षण खर्चांत बचत झाली आहे.

वारसा करापासून १·२६ कोटी रु. मिळण्याची अपेक्षा आहे. याबाबतचा मूळ अंदाज ४ कोटी रु. होता. परंतु हें उत्पन्न सर्वस्वीं राज्य सरकारांस मिळणारें असल्यानें मध्यवर्ती अर्थसंकल्पावर त्याचा कांहींच परिणाम होत नाहीं. वारसा करापासून आलेल्या उत्पन्नाच्या वांटपाच्या तत्त्वांचा विचार करतां या बाबतींत पुढें फायनान्स कमिशनचा सल्ला घेण्यांत येईल आणि तोंपर्यंत प्राप्तीकर उत्पन्नांतील राज्य सरकारांच्या हिश्याप्रमाणेंच हें उत्पन्न वांटलें जाईल. या हंगामी वांटपांत फायनान्स कमिशनला फेरफार करतां येईल आणि यापासून होणारें उत्पन्न सध्यां फारसें नसल्यानें राज्यांच्या आर्थिक परिस्थितीवर विशेष महत्त्वाचा असा फरक होणार नाहीं.

### १९५५–५६ चें अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक

सध्यांच्या पद्धतीनुसार उत्पन्नाचा अंदाज ४६८·७६ कोटी रु. तर खर्च ४९८·९३ कोटी रु. असेल. म्हणजे या अर्थसंकल्पांत ३०·१७ कोटी रु. ची तूट राहील.

जकातीचें उत्पन्न १५ कोटी रुपयांनीं कमी येईल तर पेट्रोल, घासलेट व वंगणें यांची आयात न करतां होणाऱ्या देशी उत्पादनामुळें मध्यवर्ती अबकारी करांत १९·८ कोटी रुपयांनीं वाढ होईल. प्राप्तीकर चालू वर्षाच्या पातळीइतकाच राहील. रिझर्व्ह बँकेच्या इशु डिपार्टमेंटकडे असलेल्या ट्रेझरी बिलांच्या वाढीमुळें रिझर्व्ह बँकेकडून मिळणाऱ्या नफ्यांत २॥ कोटी रुपयांची वाढ दिसून येईल. फाळणी कर्जापैकी पाकिस्तानकडून येणारी रक्कम जमेस धरली नसली तरी, आयात केलेल्या साखरेच्या विक्रीमुळें झालेल्या संचित नफ्यापैकी ८ कोटी रुपये महसुलाकडे तबदील करण्यांत आले आहेत.

संरक्षण खात्याचा येत्या वर्षाचा खर्च २०२·६८ कोटी रुपये म्हणजे चालू वर्षाच्या दुरुस्त अंदाजापेक्षा ४·६६ कोटी रुपयांनीं जास्त धरलेला आहे. ही वाढ प्रामुख्यानें नाविक आणि विमानदलांचे सर्वसाधारण वाढीचे कार्यक्रम व सेवानिवृत्ति वेतनांतील सवलती यामुळें झाली आहे. सद्यःस्थितींत संरक्षणदलांच्या

संख्येंत कपात करणें वास्तववादी नसलें तरी नोकरवर्गाचा अधिक चांगल्या प्रकारें उपयोग करून घेऊन, सामुग्रीच्या खपांत कपात करून व होणारी नासधूस टाळून सरकार शक्य तितकी काटकसर करण्याची शिकस्त करीत आहे. काटकसरीची मोहीम अत्यंत जोमानें चालू असल्याचेंहि त्यांनीं सांगितलें. संरक्षण खात्यास लागणाऱ्या सामुग्रीचें भारतांतच उत्पादन करण्याबाबत बरीच प्रगति झाली असून, शक्य तितक्या अधिक क्षेत्रांत या बाबतींत स्वयंपूर्णता गांठावी असा त्यामागें हेतु आहे.

पुढील वर्षी मुलकी खर्चांत ३८·१९ कोटी रुपयांनीं वाढ होण्याची अपेक्षा आहे. ही वाढ मुख्यतः पंचवार्षिक योजनेच्या शेवटच्या वर्षांत विकासखर्चासाठीं दिलेल्या रकमांमुळें झाली आहे. राष्ट्ररचनेच्या कार्यासाठीं व विकासकार्यासाठीं होणाऱ्या खर्चांत २०·१ कोटी रुपयांनीं वाढ दिसून आली. याशिवाय समाज विकास योजना आणि राष्ट्रीय शेतकी विस्तार संघटना यांवरील खर्चांत ४·४४ कोटी रुपये, कायदेमंडळें असलेल्या 'क' विभागनीय राज्यांना विकासयोजनांसाठीं दिलेल्या मदतींत २·४१ कोटी रुपये, अनुसूचित जन–जाति व अनुसूचित क्षेत्रें यांच्या विकासासाठी असलेल्या मदतींत ८१ लक्ष रुपये, प्राथमिक शिक्षणासाठी दिलेल्या मदतींत ५० लक्ष रुपये आणि समाज-कल्याण आणि मागासलेल्या जमातींचें कल्याण यासाठी १·१ कोटी रुपये याप्रमाणें वाढ होईल.

तसेंच प्रचलित धान्यसांठे, मुख्यतः तांदळाचे सांठे काढून टाकण्यानें होणारी संभाव्य व्यापारी नुकसानी हिशेबांतून काढून टाकण्यासाठी पहिला हप्ता म्हणून ३ कोटी रुपयांची तरतूद करण्यांत आली आहे. एकूण नुकसानी ४५ कोटी रुपये येईल असा अंदाज आहे. इतर वाढींत ईशान्य सीमा–विभागांतील कारभार व विकास–यंत्रणांत वाढ करण्यासाठी लागणारे १·४६ कोटी रुपये, व मुलकी बांधकामासाठीं लागणारे १·२७ कोटी रुपये यांचा अंतर्भाव आहे.

## भांडवली खर्च

चालू वर्षीतील दुरुस्त भांडवली खर्च १७८·५४ कोटी रुपये धरण्यांत आला होता. हा मूळ अंदाज १४५·७५ कोटी रुपये होता. सांठा करण्यासाठी तांदळाची खरेदी, यासारख्या सरकारी व्यापार–योजनांत आलेल्या ६१·५९ कोटी रुपयांच्या तुटीमुळें खर्चांत ही वाढ झाली. तथापि इतर कांहीं बाबींत २८·८ कोटी रुपये बचत झाल्यानें प्रत्यक्ष वाढ इतकीच झाली.

पुढील वर्षासाठीं भांडवली खर्च २२३·३ कोटी धरण्यांत आला आहे. त्यांपैकीं संरक्षण खात्याच्या भांडवली खर्चाच्या तरतुदीसाठी २२·३८ कोटी रुपये, मुलकी बांधकामासाठी ३२ कोटी रुपये, मुख्यतः गव्हाची आयात करण्याच्या सरकारी व्यापारासाठी २९ कोटी रुपये, रेल्वेसाठी ६६ कोटी रुपये, स्थलांतरितांस नुकसानभरपाई देण्यासाठी २१ कोटी रुपये, हैदराबाद राज्याचे कर्जरोखे रद्द करण्यासाठी ७·७ कोटी रुपये आणि हिंदुस्थान स्टील लि. कंपनींत गुंतविण्यासाठी ५ कोटी रुपये अशी तरतूद आहे.

याशिवाय राज्य सरकारें व इतरांना प्रामुख्यानें विकास–कार्यासाठी कर्जें देण्यासाठी या वर्षांत ३०६ कोटी रुपयांची व पुढील वर्षांत ३५५ कोटी रुपयांची तरतूदहि सदर अंदाजांत करण्यांत आली आहे. मूळचा अंदाज २४९ कोटी रुपयांचा होता.

## मार्ग आणि साधनें याबाबतची परिस्थिति

दुरुस्त अंदाजाप्रमाणें एकूण तूट २०८ कोटी रुपयांच्या बेतास होईल. मूळ अर्थसंकल्पांत ती २२९ कोटी रुपये धरली होती. प्रारंभींची शिल्लक आवश्यक किमान ५० कोटी रुपयांपेक्षा १२ कोटी रुपयांनीं कमी असल्यानें ट्रेझरी बिलांत सुमारें २२० कोटी रुपयांपर्यंत वाढ होईल.

या वर्षी उभारलेल्या दरसाल दर शेंकडा ३॥ टक्के दराच्या राष्ट्रीय योजना कर्जास मिळालेला पाठिंबा समाधानकारक होता. त्यांत एकूण भरणा झालेल्या १५८ कोटी रुपयांपैकी २५॥ कोटी रुपये राज्य सरकारांना देण्यांत आले. तशी व्यवस्था केली नसती तर कर्ज उभारणीसाठी त्यांनीं वेगळे प्रयत्न केले असते.

छोट्या बचतींच्या योजनेंतहि उल्लेखनीय प्रगति झाली असून, कांहीं वर्षांपूर्वी यामार्गें पैसा गोळा करण्यासाठी ठरविलेल्या ४५ कोटी रुपयांच्या वार्षिक लक्ष्यापेक्षा अधिक रक्कम प्रथमच जमा होण्याचा संभव आहे. अर्थमंत्री म्हणतात, "ही गोष्ट आनंददायक असली तरी यापेक्षा अधिक प्रयत्न करावेत आणि या मोहिमेचा प्रसार करण्यासाठी प्रत्येकानें मनापासून सहकार्य करावें व त्याद्वारें देशाचा विकास व सुबत्ता साधण्यासाठी बराच हातभार लावावा अशी मी कळकळीची विनंती करतों. विकास योजना पुऱ्या करण्यासाठी वाढत्या प्रमाणांत मोठ्या रकमा लागणार असल्यानें छोट्या बचतींची मोहीम संघटित करण्यास आतां तर अधिकच महत्त्व प्राप्त झालें आहे. देशाच्या अर्थव्यवस्थेंत ही गोष्ट नेहमींच आवश्यक मानली जाते."

## ट्रेझरी बिलें काढून तूट भरून काढणार

पुढील वर्षांत एकूण तूट ३४० कोटी रुपये येईल असा अंदाज आहे. ही तूट भरून काढण्याइतकी रोख शिल्लक नसल्यानें ती तूट ट्रेझरी बिलें काढूनच भरून काढावी लागेल.

सरकारला महसुली तूट भरून काढण्यासाठी ३० कोटी रुपये, भांडवली खर्च, राज्य सरकारें व इतरांना कर्जें देण्यासाठी ५७८ कोटी रुपये आणि मुदत पूर्ण झालेलीं कर्जें फेडण्यासाठीं ६९ कोटी रुपये लागतील. तर बाजारांतील कर्जाद्वारें १२५ कोटी रुपये व छोट्या बचतींपासून ५२ कोटी रुपये मिळतील अशी आशा सरकारला वाटत आहे. पुढील वर्षी ७४ कोटी रु. परकीय मदत मिळेल अशी अपेक्षा असून मिसलेनियस डेट व रेमिटन्स ट्रॅन्सॅक्शन्स यांपासून ८६ कोटी रुपये मिळतील. यामुळें अर्थ-संकल्पांतील एकूण तूट ३४० कोटी रुपयांची राहील.

## धैर्याची वाटचाल : दक्षतापूर्वक प्रयत्न

"अर्थसंकल्पांतील या फार मोठ्या तुटीमुळें चलनवाढीची भीति नसून, उत्पादन, किंमती, परकीय हुंडणावळ, इत्यादि आर्थिक दर्शकांवरून देशास अधिक धैर्यानें वाटचाल करतां येईल असें दिसून येतें. तथापि परिस्थितीचें सतत व काळजी-पूर्वक निरीक्षण करण्यांत येईल व विकासाच्या कोणत्याहि उल्लेखनीय प्रयत्नांचे बाबतींत सरकार धोका स्वीकारण्यास तयार असलें तरी तो दक्षता बाळगूनच घेण्यांत येईल." असें आश्वासन अर्थमंत्र्यांनीं सभागृहास दिलें.

---

## न्यू इंडिया ॲशुअरन्स कं. लि.

न्यू इंडिया ॲशुअरन्स कं. लि. नें १९५५ मध्यें ४३·२४ कोटी रुपयांचें काम पुरें केलें. १९५४ मधील कामाचा आकडा १९·९ कोटी रुपये होता.

## मा. वि. धारपुरे : व्यक्ति आणि कार्य

( लेखकः—पु. म. काशीकर,
लॉर्ड रे महाराष्ट्र इं. म्युझियम, पुणें २. )

[ २ ]

### लोकसंग्रह

संग्रहालयाचें कार्य करीत असतांना सर्व प्रकारच्या लोकांशीं त्यांचा परिचय झाला व त्यांत लहान-मोठे, गरीब-श्रीमंत, विद्वान्, उद्योगपति, लक्ष्मीपति, राजेरजवाडे, सरकारी अधिकारी या सर्वांचा समावेश होतो. त्यांची वाणी फार गोड असे व आपलें म्हणणें ते अत्यंत आग्रही व तळमळीच्या वृत्तीनें मांडीत. त्या कारणानें ऐकणाराचे मनावर त्याचा परिणाम होत असे. संग्रालयास आतां-पर्यंत लक्षावधि लोकांनीं भेट दिली. त्याचप्रमाणें शेंकडों थोर सद्गृहस्थांनींहि संग्रलय पाहून श्री. धारपुरे करीत असलेल्या संग्रहालयाच्या कार्याची उत्तम प्रकारें प्रशंसा केली आहे. यांत ब्रिटिश राजवटींतील गव्हर्नर व इंग्रज आय्. सी. एस. अधि-काऱ्यांपासून महात्माजी, पंडित नेहरू, कॉंग्रेसमंत्रि व पुढारी हे सर्व आहेत. महात्माजींनीं आपल्या अभिप्रायांत असें म्हटलें आहे :

आपका उद्योग प्रशंसनीय है, मैं क्या साहाय्य देनेवाला था आपका उद्योगहि आपको ध्येयको पहुचेंगा.

पंडित नेहरूंनीं आपल्या अभिप्रायांत I wished there were more such Museums in India असें म्हटलें आहे.

संग्रहालयांतील सेवकांशीं त्यांचे संबंध अत्यंत जिव्हाळ्याचे होते. सेवक सुखी व समाधानी असेल तरच तो संस्थेची सेवा चांगल्या प्रकारें करूं शकतो ही त्यांची ठाम विचारसरणी होती. यासाठी संग्रहालय-सेवकांना संस्थेच्या आर्थिक परिस्थितीच्या मर्यादेंत जेवढें सुखी करणें शक्य असेल तेवढें करण्याची ते खटपट करीत असत. जास्तींत जास्त सवलती ते सेवकांना देत असत. कांहीं प्रसंगीं थोडें आडवाटेला जाऊनहि त्यांचेसाठीं गोष्टी ते करीत असत. हें सर्व करण्यांत उद्देश व अपेक्षा एकच असे कीं, सेवकांनीं संग्रहालयाची उत्कृष्ट सेवा करून त्याची भरभराट करणेस मदत करावी. संग्रहालय-सेवकांनीं नवीन नवीन वाचून, पाहून, आपल्या ज्ञानांत भर घालावी व त्याचा फायदा संग्रहालयाच्या कार्यांत करावा अशीहि त्यांची इच्छा असे. यासाठी ते शक्यतेनुसार खर्च करीत असत. मध्यंतरीं मुंबई येथें एक आंतरराष्ट्रीय प्रदर्शन भरलें होतें, तें पाहून येणेंसाठीं संग्रहलया-कडील कांहीं सेवकांस ठराविक रकम त्यांनीं दिली होती व त्यानुसार ५–६ सेवक तें प्रदर्शन पाहूनहि आले. दिल्ली येथें भरलेलें प्रदर्शन पहावयास जाणेसाठींहि त्यांनीं कांहीं सेवकांना द्रव्यसाहाय्य देऊं केलें होतें. संग्रहालयाकडे कर्तबगार व चांगल्या दर्जाचीं माणसें कामास असावींत; त्यायोगें संग्रहालयाचा दर्जा वाढतो अशी त्यांची विचारसरणी असे व त्या दिशेनें चांगलीं माणसें मिळविण्याचा त्यांचा प्रयत्न असे. कॉमर्स कॉलेजमधील कांहीं विद्यार्थ्यांना कांहीं तास काम देऊन त्यांना थोडेसें विद्यावेतन देऊन त्यांना त्यांचा विद्याभ्यास पूर्ण करणेस मदत करावी, या हेतूनें गेल्या ७–८ वर्षांपासून प्रतिवर्षीं पुणें येथील बृहन्महाराष्ट्र कॉलेज ऑफ कॉमर्समधील २-३ विद्यार्थी संग्रहालयांत काम करीत आहेत. आतांपर्यंत अशा प्रकारें ७–८ विद्यार्थी आपले अभ्यासक्रम संपवून पदवीधर होऊन बाहेर पडले आहेत. सेवकानें केलेल्या चांगल्या कामाबद्दल त्यांना कौतुक वाटत असे व दुसऱ्याजवळ ते त्याचा मोठ्या आनंदानें उल्लेख करीत असत; अशी गुणज्ञ व दिलदार मनोवृत्ति त्यांची असे. १९४७–४८ मध्यें ते परदेशीं गेले असतांना प्रस्तुत लेखकाकडे क्युरेटरचें काम त्यांनीं एक वर्षभर सोंपविलें होतें. परदेशाहून परत आल्यानंतर मुंबईस धक्क्यावर जेव्हां त्यांची भेट झाली तेव्हां त्यांनीं पाठीवर हात फिरवून शाबासकी दिली, तेव्हां प्रस्तुत लेखकास अंगावर मूठभर मांस चढल्यासारखें वाटलें.

सेवा, सुरक्षा आणि सौजन्याचें प्रतीक
स्थापना १९१८
सारस्वत
को-ऑपरेटिव्ह बँक
लिमिटेड.
सारस्वत बँक बिल्डिंग, गिरगांव, मुंबई
अधिकृत भांडवल रु. १०,००,०००
वसूल झालेलें भांडवल रु. ७,२९,०००
रिझर्व रु. ६,०५,६००
ठेवी रु. १,२९,००,०००
बँकेचे सर्व व्यवहार केले जातात.
★ शाखाः दादर, माहीम, बेळगाव, पुणें ★

### परदेशीय संग्रहालयें पहाणेची महत्त्वाकांक्षा

परदेशांत जाऊन तेथील संग्रहालयें पाहावीं व अभ्यासावीं, ही त्यांची एक महत्त्वाकांक्षा होती व ती कित्येक वर्षें ते मनांत बाळगून होते. योग्य संधि मिळतांच खटपट करून त्यांनीं ती पुरी केली. परदेशांतील संग्रहालयांत विशेष काय आहे व शिक्षण-विषयक कोणकोणतीं कामें तीं करतात हें पाहून तशीं कामें आपल्या संग्रहालयामार्फत करावींत असा त्यामागील हेतु होता. परत आल्यानंतर तेथें ज्या नवीन गोष्टी त्यांनीं पाहिल्या त्याचा प्रारंभ त्यांनीं येथें केला. कांहीं गोष्टी अगोदरच संग्रहालयामार्फत येथें चालू करण्यांत आल्या होत्या.

### संग्रहालयीन कायदा व सरकारी साहाय्य

संग्रहालयासाठी स्वतंत्र कायदा असावा व त्या कायद्यानुसार तें चालावें व असें केल्यानें त्यास स्थैर्य येईल व त्याचा दर्जा वाढेल या हेतूनें संग्रहालयासाठी कायदा व्हावा यासाठी त्यांनीं अतिशय परिश्रम केले. संग्रहालयाचा कायदा सन १९४७ मध्यें संमत करण्यांत आला. त्यावेळचे मुख्य व शिक्षणमंत्रि श्री. बाळासाहेब खेर यांना संग्रहालयाचें कार्य पसंत पडून असा कायदा संमत केल्यानें मुंबई राज्यांतील संग्रहालयचळवळीचें पाऊल पुढें पडेल अशा अपेक्षेनें त्यांनीं संग्रहालय-कायदा विधिमंडळापुढें मांडून संमत करून घेतला. १९३७ सालीं कॉंग्रेस मंत्रिमंडळ अस्तित्वांत आल्यापासून आजतागायत मुंबई सरकार-कडून वाढत्या प्रमाणांत संग्रहालयास आर्थिक व इतर साहाय्य मिळत आलें आहे. यांत श्री. धारपुरे यांची कर्तबगारी व कार्यैकनिष्ठा अधिक महत्त्वाची, कीं सरकारची दातृत्ववृत्ति अधिक महत्त्वाची, याची चिकित्सा अस्थानीं आहे. चांगल्या कार्यासाठी परमेश्वर पैसा पुरवितो अशी त्यांची श्रद्धा असे व याचें प्रत्यंतर वेळोवेळीं संग्रहालयाचे बाबतींत त्यांना येत असें.

( अपूर्ण )

## दि भारत इंडस्ट्रियल बँक लिमिटेड, पुणें

### संचालकांचा १७ वा अहवाल

दिनांक ३१ डिसेंबर १९५४ रोजीं संपणाऱ्या वर्षाचा ताळेबंद व नफातोटापत्रक बँकेचें संचालक मंडळ भागीदारांपुढें सादर करीत आहे. मा. हिशोब तपासणीचा दाखलाहि सोबत जोडला आहे.

अहवालाचे सालीं बँकेचे व्यवहारांत निव्वळ नफा रु. २५,३५७-९-० झाल्याचें दिसून येईल या रकमेची वांटणी खालीलप्रमाणें करावी अशी संचालकांची शिफारस आहे.

| | |
|---|---|
| रिझर्व्ह फंडास जमा करण्यासाठीं ( बँकिंग कंपनीज ॲक्ट १९४९ चे कलम १७ अन्वयें ) | रु. ६,०००-०-० |
| कर्जरोख्यावरील घसारा फंडासाठीं | रु. १,०००-०-० |
| ६% क्यु. प्रे. शेअर्सवर डिव्हिडंड देण्यासाठीं | रु. १,२२५-०-० |
| भागांवर २% प्रमाणें करमाफ डिव्हिडंड देण्यासाठीं | रु. ७,४६०-०-० |
| शिल्लक पुढील वर्षासाठीं ( subject to taxation ) | रु. ९,६७२-९-० |
| | रु. २५,३५७-९-० |

सर्वसाधारण मंदीची लाट असतांनाहि अहवालाचे सालीं बँकेचे व्यवहार समाधानकारक झाले आहेत, असेंच म्हणावें लागेल.

### इं. क्रे. कॉर्पोरेशनचे सर्व शेअर्स खपले

इंडस्ट्रिअल क्रेडिट ॲंड इन्व्हेस्टमेंट कॉर्पोरेशननें विक्रीस काढलेले ५ कोटी रुपयांचे सर्व भाग विकले गेले आहेत. कॉर्पोरेशन आतां सरकारकडे कराराप्रमाणें ७½ कोटी रु. कर्जाची मागणी करूं शकेल. व्यवहार सुरू करण्यासाठीं कमेन्समेंट सर्टिफिकेट मिळविण्याकरितां रजिस्ट्रार ऑफ कंपनीजकडे अर्ज केला जाईल.

### मध्यभारतांतील बँकांची परिषद

मध्यभारतांतील बँकांच्या प्रतिनिधींची एक परिषद् उज्जैन येथें मार्चच्या अखेरीस भरणार आहे, त्यावेळीं सुमारें ३० बँकांचे प्रतिनिधी उपस्थित होतील, अशी अपेक्षा आहे. श्री. वैकुंठराय ल. मेहता ह्यांना अध्यक्षस्थान स्वीकारण्याची विनंति करण्यांत आली आहे.

### ब्रिटिश बँकरेट वाढीचा भारतावर परिणाम ?

बँक ऑफ इंग्लंड रेट ३½% चा ४½% करण्यांत आला आहे, म्हणून केवळ रिझर्व्ह बँकरेट वाढण्याचें कारण नाहीं. लंडनमध्यें पैसा मिळणें अवघड झालें, म्हणजे एक्सचेंज बँका भारतांत गुंतविण्यासाठीं लंडनमधून पैसा आणण्याचें शक्य तेवढें टाळतील व भारतांतच पैसा उभारण्याचा प्रयत्न करतील. त्यामुळें लहान मुदतीच्या ठेवींसाठीं स्पर्धा वाढेल, अशी अपेक्षा आहे.

### सीलोनला शस्त्रास्त्रांचा पुरवठा

सीलोन सरकार आपल्या संरक्षक दलाला लागणारीं शस्त्रें ब्रिटनकडून घेणार आहे, असें समजतें. ही सामुग्री फक्त अंतर्गत बंदोबस्तासाठींच वापरण्यांत येणार आहे, असें आश्वासन सीलोनचे पंतप्रधान मि. कोटलावाला ह्यांनीं दिल्याची वार्ता आहे.

दी भारत इंडस्ट्रिअल बँक लिमिटेड

हेड ऑफिस : पुणें शहर

शाखाः—पुणें लष्कर, बारामती, लोणावळा, श्रीरामपूर ( बेलापूर रोड ), ओझर ( जि. नाशिक ) खोपोली ( जि. कुलाबा )

श्री. के. पां. जोशी ( अध्यक्ष ) | श्री. द. ब. गिरमे ( उपाध्यक्ष )

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. १५,४३,८१० |
| विक्री झालेलें भांडवल | रु. ७,९३,८१० |
| वसूल भांडवल | रु. ४,००,००० |
| रिझर्व्ह फंड व इतर रिझर्व्ह | रु. १,००,००० |

एकूण खेळतें भांडवल ६० लाखांचे वर

बँकेचे नवीन इमारतींत माफक भाड्यांत सेफ डिपॉझिट लॉकर्सची सोय केली आहे.

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

श्री. रा. बा. साळवेकर B. A., LL. B. / श्री. नी. ना. क्षीरसागर } मॅनेजिंग डायरेक्टर.

पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह् बँक लि.

— पुणें शहर —

लक्ष्मी रोड

पोस्ट बॉक्स नं. ५११ ]　　[ टेलिफोन नं. २४८१

भोर, पौड व वडगांव ( मावळ ) येथें बँकेनें आपल्या नवीन शाखा-कचेऱ्या उघडल्या आहेत. येथें व इतर शाखांतहि सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार व सहकारी सोसायट्यांना शेतीसाठी कर्जे देणें, सोनें-चांदीचे तारणावर कर्जे देणें, वगैरे व्यवहार सुरू केले आहेत.

चालू, सेव्हिंग्ज ठेवी स्वीकारल्या जातात.

अेक ते दहा वर्षे मुदतीच्या ठेवीहि स्वीकारल्या जातात.

१ वर्ष २ टक्के, २ वर्षे २॥ टक्के, ५ वर्षे ३ टक्के, ७ वर्षे ३॥ टक्के, १० वर्षे ४ टक्के. याशिवाय रुपये २५,००० अगर पुढील रकमा ३ ते ९ महिने मुदतीनें घेण्यांत येतात.

दराबद्दल समक्ष चौकशी करावी.

वरीलप्रमाणें सर्व व्यवहार पुणें येथें मुख्य कचेरींत व इतर शाखांमध्यें होत असून त्यांखेरीज पुणें येथें सेफ डिपॉझिट व्हॉल्टस् व सेफ कस्टडीची सोय आहे. त्याचा फायदा खातेदारांनीं घ्यावा.

जास्त माहितीसाठीं लिहा अगर समक्ष भेटा.

मो. वि. रवडे,
मॅनेजिंग डायरेक्टर.

हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९३५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शार्ङ्गपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास', ८२३ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ), पुणें ४, येथें प्रसिद्ध केलें.